**Government Of Maharashtra**
महाराष्ट्र शासन
**Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**
उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.
विकास सेटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.
Email :
Tel.No. 25206199/25208182
didicmumbai@gmail.com

---

**मुंबई उपनगर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक १४.१२.२०२३ चे इतिवृत्त.**

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठित करण्याबाबत, शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. निप्रप-२०२०/प्र.क्र. २८/उद्योग-७, दि. १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आल्यानुसार मुंबई उपनगराकरीता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आल आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व निर्यातदारांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याकरीता तसेच जिल्ह्यातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन समिती परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरीता मुंबई उपनगर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४.१२.२०२२३ रोजी दुपारी ०३.३० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, १० वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई येथे संपन्न झाली.

सर्व प्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांचे वतीने मा. उद्योग अधिकारी (प्रशासन) यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करून निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई उपनगर जिल्हाकरीता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत तसेच मुंबई नगराकरीता एक जिल्हा एक उत्पादन प्रकरणी निर्यात प्रोत्साहनाकरीता तसेच निर्यात वाढीकरीता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मागील इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना अग्रेषित केलेल्या अर्धशासकीय पत्रात नमुद मुद्यांबाबत कार्यवाहीचा अहवाल (Compliance Report) मा. अध्यक्ष यांना सादर केला. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

| अ.क्र | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांनी दिलेले निर्देश. |
|---|---|---|---|
| १. | Ernst & Young प्रकल्प सल्लागार | • Gems & Jwellery क्षेत्रातील झालेल्या घसरणीबद्दल चर्चा झाली.<br>• १० Point Program वर चर्चा Cornell Maharashtra ६०, IGNITE Maharashtra असे नाविन्यपूर्ण कार्यक्रम संभाव्य निर्यातदारांसाठी आयोजित करण्यात आले होते. | • शासनाने EPC ला मदत करावी. (गुणवत्ता, पॅकेजिंग सुधारणा करण्यात यावी.) आर्थिक सहाय्य कार्यशाळा, अनुदान द्यावे.<br>• निर्यातक्षेत्रात MSME चे भरीव योगदान असुन त्यांना अजून जास्तीत जास्त सामावुन घ्यावे. बाजार विस्तारिकरण करणे गरजेचे आहे. |
| २. | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, | • मुंबई मध्ये कार्यशाळा घेण्यात यावी. | • सर्व निर्यात प्रचालन समितींने लवकरात लवकर कार्यशाळा आयोजित करावी. तसेच बँकेत कार्यशाळेबद्दल स्टॉल लावावा.<br>• निर्यातदारांच्या व निर्यात प्रचालन समितींच्या शंकानिरासणासाठी ऑनलाईन कार्यप्रणाली उभी करावी. |
| ३. | Engineering Export Promotion Council | • अभियांत्रिकी निर्यात वाढविण्यासाठी रशिया या देशाकडे लक्ष केंद्रित करावे. | • निर्यात कृती आराखडा आणि निर्यात धोरण सर्व निर्यात प्रचालन समितीला पुन्हा पाठविणे. तसेच सर्व निर्यात प्रचालन समिती कार्यक्रमाचे / कार्यशाळेचे दिनदर्शिका शासनास द्यावे. |

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मु.प्रा.वि.) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.

मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.